DAY — **06** **SEAT NUMBER** | | | | | | |

| 2020 | II | 26 |
|---|---|---|

| 1500 |
|---|

**J-351**

**(M)**

# HISTORY (38)

**Time : 3 Hrs.** **(4 Pages)** **Max. Marks : 80**

*सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

*(२) उजव्या बाजूस गुण दर्शविलेले आहेत.*

*(३) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानांवर लिहा.*

प्र. १. (अ) खालील दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा : (८) [१२]

(१) भूतकाळातील मनोरंजक आणि संस्मरणीय घटनांचा शोध घेणे म्हणजे ------- होय.

(अ) भूगोल (ब) इतिहास

(क) पुरातत्त्वशास्त्र (ड) आलेखशास्त्र

(२) ------- गोव्यात पहिले मुद्रणालय सुरू केले.

(अ) डचांनी (ब) इंग्रजांनी

(क) पोर्तुगीजांनी (ड) फ्रेंचांनी

(३) 'रणगाडा' संग्रहालय ------- येथे आहे.

(अ) मुंबई (ब) अंजनेरी

(क) औरंगाबाद (ड) अहमदनगर

(४) भारतात इ. स. १८५६ मध्ये ------- याने पुरातत्त्व विभागाची स्थापना केली.

(अ) लॉर्ड वेलस्ली (ब) लॉर्ड डलहौसी

(क) लॉर्ड कर्झन (ड) लॉर्ड रिपन



https://www.maharashtrastudy.com

(५) मराठी विश्वकोश कार्यालय ------- येथे आहे.

(अ) कोल्हापूर (ब) मुंबई

(क) पुणे (ड) वाई

(६) केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून ------ निवडले जातात.

(अ) उपजिल्हाधिकारी (ब) तहसीलदार

(क) जिल्हाधिकारी (ड) नायब तहसीलदार

(७) प्रकल्प पद्धतीचा उगम ------- यांच्या कार्यवादात आढळून येतो.

(अ) जॉन ड्युई (ब) सॉक्रेटिस

(क) ब्रुनर (ड) अल्बर्ट आईन्स्टाईन

(८) प्राचीन भारतात शिक्षकाला ------- असे म्हटले जात होते.

(अ) प्राचार्य (ब) पंडित

(क) आचार्य (ड) प्राध्यापक

**(ब) खालील 'अ' व 'ब' गटांतून योग्य जोड्या जुळवा :** (४)

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (अ) डॉ. ह. धि. सांकलिया | (१) पहिले भारतीय सनदी अधिकारी |
| (ब) महादेवशास्त्री जोशी | (२) ज्ञानरचनावादी तत्त्वज्ञ |
| (क) सत्येंद्रनाथ टागोर | (३) अमरकोश |
| (ड) गिम्बा टिस्टा विकी | (४) पुराश्मयुगीन हत्यारांचा शोध |
| | (५) प्रकल्प पद्धती |
| | (६) भारतीय संस्कृतिकोश |

**प्र. २. खालील प्रश्नांची प्रत्येकी 'एका वाक्यात' उत्तरे लिहा ( कोणतेही आठ ) :**

(१) लोकसंख्येचा विस्तृत अभ्यास कोणत्या शास्त्रात केला जातो?

(२) 'आकाशवाणी' या कवितेची रचना कोणी केली?

(३) 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे नाटक कोणी लिहिले?

(४) विजापूर येथील गोलघुमट स्मारक कोणी बांधले?

(५) भारतात पहिले वस्तुसंग्रहालय कोठे स्थापन झाले?

(६) भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार कोठे आहे?



https://www.maharashtrastudy.com

(७) राज्यव्यवहार कोशाची निर्मिती कोणाच्या आज्ञेवरून झाली?

(८) मराठी भाषेतील 'भारतीय प्राचीन चरित्रकोश' कोणी लिहिला?

(९) नागरी सेवा परीक्षेतील मुलाखतीला किती गुण दिले जातात?

(१०) ज्ञानरचनावादाचे किती प्रकार आहेत?

**प्र. ३. खालील विधानांची प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत कारणे लिहा (कोणतेही चार) :**

(१) ऐतिहासिक घटना ह्या समकालीन असतात.

(२) वृत्तपत्रांना समाजाचा आरसा म्हणतात.

(३) आलेखांना ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण स्थान आहे

(४) ऐतिहासिक कागदपत्रांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

(५) विश्वकोशाचे वाङ्मय हे संस्कृती व ज्ञानस्तराचे मानचिन्ह ठरले आहे

(६) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली

https://www.maharashtrastudy.com

**प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा ( कोणतेही चार ) :** [१२]

(१) गतकाळाच्या अभ्यासातून भविष्यकाळाचे मार्गदर्शन कसे होते?

(२) एफ. एम. रेडिओविषयी माहिती लिहा.

(३) चित्रपटांमुळे कलेला (talent) उत्तेजन कसे मिळते?

(४) पर्यटनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(५) संग्रहालयातील व्यवस्थापक पदासाठी कोणती शैक्षणिक पात्रता असावी?

(६) प्रश्नोत्तर पद्धतीची गुणवैशिष्ट्ये लिहा.

**प्र. ५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ४० ते ५० शब्दांत लिहा ( कोणतेही तीन ) :** [१२]

(१) आकाशवाणीवरील कार्यक्रमांची माहिती लिहा.

(२) पर्यटक मार्गदर्शकाची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(३) महाराष्ट्रातील अजिंठा व वेरूळ येथील लेण्यांविषयी माहिती लिहा.

(४) इतिहास शब्दकोशाची माहिती लिहा.

(५) इतिहास शिक्षकाची आवश्यक गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करा.

https://www.maharashtrastudy.com

प्र. ६. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रत्येकी ८० ते १०० शब्दांत खालील प्रश्नांची उत्तरे लिहा ( कोणतेही दोन ) :

(१) इतिहासाचे उपयोजन खालील विविध विषयांत केले जाते

(अ) नाणकशास्त्र

(ब) शिलालेखशास्त्र

(क) लिपिशास्त्र

(२) भारतातील प्रारंभीच्या मुद्रणालयाची माहिती लिहा.

(अ) सेरामपूर मुद्रणालय

(ब) सुरत मुद्रणालय

(क) त्रावणकोर व तंजावर मुद्रणालय

(३) मध्ययुगीन इतिहासाची साधने -

(अ) तामपट / ताम्रलेख

(ब) शिलासन

(क) स्मृतिशिळा

प्र. ७. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा ( कोणतेही दोन ) :

(१) दूरदर्शनची कार्ये लिहा.

(२) मूर्तींची वैशिष्ट्ये सांगून मूर्तींची ऐतिहासिक उपयोजिता स्पष्ट करा.

(३) मुलाखतीचा उद्देश, मुलाखत मंडळ आणि तंत्रांची माहिती लिहा.

◆◆◆

**https://www.maharashtrastudy.com**
**Whatsapp @ 9300930012**
**Send your old paper & get 10/-**
**अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये पायें,**
**Paytm or Google Pay से**

https://www.maharashtrastudy.com